सन २०२२ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची
जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २२२१/प्र.क्र.११२/कार्या.२९,**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३१ डिसेंबर, २०२१

## परिपत्रक :-

सन २०२२ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिनांचे कार्यक्रम सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार मंत्रालयात व सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात साजरे करण्यात यावेत.

२. परिशिष्टात दर्शविलेले कार्यक्रम सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी/स्थानिक सुट्टीच्या दिवशी येत असतील आणि या संदर्भात केंद्र शासनाने कार्यक्रमात बदल सुचविल्यास त्याप्रमाणे साजरे करण्यात यावेत, अन्यथा ते कार्यक्रम त्याच दिवशी साजरे करण्यात यावेत.

३. मंत्रालयीन विभाग/ विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या विभागातील / जिल्हयातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयात सदर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित करुन त्यांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२११२३११४४९५६९२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SUNIL J
TUMRAM

(सु. ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभाग,
८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
९. सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दी देण्यासाठी)
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. सर्व जिल्हाधिकारी,
१३. सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४. आयुक्त, सर्व महानगरपालिका,

J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar 421 001 Thane (India)

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.जपुति २२२१/प्र.क्र.११२/कार्या.२९, दि. ३१.१२.२०२१ चे परिशिष्ट

सन २०२२ मध्ये मंत्रालय,शासकीय/निमशासकीय कार्यालयात साजरे करावयाच्या जयंती /राष्ट्रीय दिन कार्यक्रमांची यादी

| अ.क्र | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय सौर दिनांक | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सावित्रीबाई फुले जयंती | ०३ जानेवारी, २०२२ | सोमवार | १३ पौष, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २ | जिजाऊ माँ साहेब जयंती | १२ जानेवारी,२०२२ | बुधवार | २२ पौष, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३ | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी,२०२२ | बुधवार | २२ पौष, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४ | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | २३ जानेवारी,२०२२ | रविवार | ०३ माघ, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ५ | बाळासाहेब ठाकरे जयंती | २३ जानेवारी, २०२२ | रविवार | ०३ माघ, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ६ | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी, २०२२ | मंगळवार | २६ माघ, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ७ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०२२ | शनिवार | ३० माघ, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ८ | संत गाडगे बाबा जयंती | २३ फेब्रुवारी, २०२२ | बुधवार | ०४ फाल्गुन, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ९ | संत रविदास महाराज जयंती (तिथीनुसार) | २३ फेब्रुवारी,२०२२ | बुधवार | ०४ फाल्गुन, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १० | यशवंतराव चव्हाण जयंती | १२ मार्च, २०२२ | शनिवार | २१ फाल्गुन, शके १९४३ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ११ | शहीद दिन | २३ मार्च, २०२२ | बुधवार | ०२ चैत्र, शके १९४४ | शहीद भगतसिंग,राजगुरु व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १२ | महात्मा ज्योतिबा फुले जयंती | ११ एप्रिल, २०२२ | सोमवार | २१ चैत्र, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०२२ | गुरुवार | २४ चैत्र, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १४ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती | ३० एप्रिल, २०२२ | शनिवार | १० वैशाख, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १५ | महात्मा बसवेश्वर जयंती (तिथीनुसार) | ०३ मे, २०२२ | मंगळवार | १३ वैशाख, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १६ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस | २१ मे, २०२२ | शनिवार | ३१ वैशाख, शके १९४४ | दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ घेणे. |
| १७ | महाराणा प्रतापसिंह जयंती (तिथीनुसार) | २५ मे, २०२२ | बुधवार | ०४ ज्येष्ठ, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १८ | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे, २०२२ | शनिवार | ०७ ज्येष्ठ, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| १९ | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१ मे, २०२२ | मंगळवार | १० ज्येष्ठ, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २० | राजर्षि शाहू महाराज जयंती | २६ जून,२०२२ | रविवार | ०५ आषाढ, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २१ | वसंतराव नाईक जयंती | ०१ जुलै, २०२२ | शुक्रवार | १० आषाढ, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २२ | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती | २३ जुलै, २०२२ | शनिवार | ०१ श्रावण , शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २३ | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | ०१ ऑगस्ट, २०२२ | सोमवार | १० श्रावण, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २४ | क्रांतिसिंह नाना पाटील जयंती | ०३ ऑगस्ट, २०२२ | बुधवार | १२ श्रावण, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २५ | सद्भावना दिवस | २० ऑगस्ट, २०२२ | शनिवार | २९ श्रावण, शके १९४४ | सद्भावना दिवसाची शपथ घेणे. |
| २६ | राजे उमाजी नाईक जयंती | ०७ सप्टेंबर, २०२२ | बुधवार | १६भाद्रपद, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २७ | केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती | १७ सप्टेंबर,२०२२ | शनिवार | २६भाद्रपद, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २८ | पंडीत दिनदयाळ उपाध्याय जयंती – अंत्योदय दिवस | २५ सप्टेंबर, २०२२ | रविवार | ०३आश्विन, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| २९ | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर,२०२२ | रविवार | १० आश्विन, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३० | लाल बहादूर शास्त्री जयंती | ०२ ऑक्टोबर, २०२२ | रविवार | १०आश्विन, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३१ | महर्षि वाल्मिकी जयंती (तिथीनुसार) | ०९ ऑक्टोबर,२०२२ | रविवार | १७ आश्विन, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३२ | डॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम जयंती | १५ ऑक्टोबर,२०२२ | शनिवार | २३ आश्विन, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३३ | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ ऑक्टोबर, २०२२ | सोमवार | ०९ कार्तिक, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ३४ | वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस | ३१ ऑक्टोबर,२०२२ | सोमवार | ०९ कार्तिक, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेणे |
| ३५ | पंडीत नेहरु जयंती | १४ नोव्हेंबर, २०२२ | सोमवार | २३ कार्तिक, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |

J. Watumull Sadhubella Girls College Ulhasnagar 421 001 Thane (India)

| अ.क्र | जयंती/राष्ट्रीय दिन | इंग्रजी महिना व दिवस | वार | भारतीय सौर दिनांक | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ३७ | इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन | १९ नोव्हेंबर, २०२२ | शनिवार | २८ कार्तिक, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे व राष्ट्रीय एकात्मता दिवसाची शपथ घेणे. |
| ३८ | संविधान दिवस | २६ नोव्हेंबर, २०२२ | शनिवार | ०५ मार्गशिर्ष, शके १९४४ | भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करणे. |
| ३९ | संत संताजी जगनाडे महाराज जयंती | ०८ डिसेंबर,२०२२ | गुरुवार | १७ मार्गशिर्ष, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |
| ४० | डॉ.भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती | २७ डिसेंबर, २०२२ | मंगळवार | ०६ पौष, शके १९४४ | प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे. |

१* शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.जपुती २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९, दि. २४.११.२००८ मधील सूचनांनुसार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी कार्यवाही करावी.

टिप:- बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीबाबतचे शासन परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

J. Watumull Sadhubella Girls College Ulhasnagar 421 001 Thane (India)

PRINCIPAL
J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar-421 001

PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2022-23)/ 16 / of 2022**

**परिपत्रक:**

**विषय:— मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करून त्याचा अहवाल सादर करणेबाबत.**

संदर्भ:— शिक्षक संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं/मवि—१/म.भा.प./२०२२/१३५७२, दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनांक १४ ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा केल्यानंतर त्या कार्यवाहीचा अहवाल विभागाच्या विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे सादर करावा (प्रत संलग्न).

6.12.22

मुंबई—४०० ०३२
२२ नोव्हेंबर,२०२२

(प्रो. सुनिल भिरूड)
कुलसचिव (प्र)

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

J. Watumull Sadhubella Girls College
Ulhasnagar-1

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

Web : www.dhepune.gov.in E-Mail :mavi.dhepune@nic.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26121158

क्र. उशिसं/मवि-१/म.भा.प./२०२२/ १३५६२ दिनांक 16 NOV 2022

## परिपत्रक

**विषय: दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.**

वाचा : मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्र. ममाषा-२०२२/प्र.क्र.१२६/भाषा-२ दि. नोव्हेंबर २०२२

राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारितील सर्व कार्यालये, मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो.

मराठी भाषा विभागाच्या, मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य धोरणास अनुसरुन मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात. त्यानुसार उपरोक्त वाचा येथील परिपत्रकान्वये, यावर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सर्व कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. (प्रत संलग्न)

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यासाठी दि. १४ ते २८ जानेवारी २०२३ दरम्यान संदर्भांकित परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार कार्यक्रम आयोजित करुन सदर कार्यक्रमाची क्षणचित्रे आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन त्यास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

दि. १४ ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये, मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये विविध कार्यक्रम आयोजीत करुन महाविद्यालयांनी त्याचा अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयास व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल तसेच सहसंचालक कार्यालयाचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. तसेच कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांनी विद्यापीठ आस्थापनेचा अहवाल सादर करावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रति,
१. कनिष्ट प्रशासन अधिकारी, प्रशा-३ कार्यासन, प्रस्तुत संचालनालय
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.